# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २२/०२/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत १५ कि.मी अंतरावर ग्रामपंचाय सिल्लोरी येथे दिनांक २१/०२/२०२२ चे २०:३० ते २१/०० वा दरम्यान फिर्यादी नामे— सौ. सोनु निचील रामटेके वय २८ व ा रा. सिल्लोरी ता. सावनेर, ता. सावनेर जि. नागपूर व आरोपी पती— निखील कैलाश रामटेके रा. सिल्लोरी ता. सावनेर, ता.सावनेर जि नागपूर हे दोघेही पती—पत्नी असून एकाच गावातील रहीवाशी आहेत. आरोपीच्या सततच्या मारहाणीमुळे फिर्यादी ही आरोपीला सोडुन मागील दिड वर्षापासुन तिची मुलगी कु. शनाया वय ४.५ वर्ष हिच्या सह तिच्या माहेरी आई गं. भा. इंदुबाइ अजाबराव गौरखेडे रा सिल्लोरी यांचेकडे राहते. दि. २१/०२/२०२२ रोजी रात्री २०/३० वा दर. फिर्यादीचा पती निखील कैलाश रामटेके हा फिर्यादीच्या आईच्या घरी दारू पिउन आला व तिच्या आइला शिवीगाळ करून सोनू कोठे आहे असे विचारले त्यावेळी फिर्यादी ही घरी झोपलेली असतांना अरोपी हा फिर्यादी जवळ जावून त्यांच्या चारित्र्यावर संशय घेवून शिवीगाळ केली. फिर्यादीने आरोपीस हटकले असता आरोपीने फिर्यादीशी भांडण करून ‘तुझा आता जिवच घेतो’ असे म्हणून दोन्ही हाताने फिर्यादीचा गळा दाबुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३०७,४५२,५०४ भा. द.वी. भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री फुलेकर मो. नं. ७५८८५६४३०० हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील मौजा कळमेश्वर ते १४ मैल कडे जाणारा रोड निमजी खदान रोड येथे दिनांक २०/०२/२२ चे १६.४५ वा. दरम्यान एमएच— ४९/एएस— ५०१३ क्रमांकाचा होंडा अमेज कारचा चालक आरोपी नामे— अनमोल विनोद खोडनकर, वय २३ वर्ष, रा. बालाजी नगर मानेवाडा नागपूर याने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रस्ता ओलांडत असतांना एमएच— ४०/एई— ५९६८ क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल स्वार रामदास देवनाथ वंजारी, वय ५३ वर्ष, रा. कळमेश्वर व धनराज नामदेव तपासे हे दोन्ही ईसम गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकामी प्रथम ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर व नंतर मेयो हॉस्पीटल येथे नेले असता धनराज नामदेव तपासे, वय ४७ वर्ष, रा. कळमेश्वर हा मरण पावला.

सदर प्रकरणी सरतर्फे सपोनी तेजराम मेश्राम पोस्टे कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी तेजराम मेश्राम मो.क्र ९०७५२४५०५९ हे करीत आहे.